महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका.
जावक क्र. मआ/एलओ/४८३०
दिनांक :-२१/०१/२०२१

## – कार्यालय परिपत्रक –

**विषय:- दिनांक २६ जानेवारी, २०२१ प्रजासत्ताक दिन ध्वजारोहण समारंभ.**

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७१ व्या वर्धापन दिन समारंभानिमित्त मंगळवार, दिनांक २६ जानेवारी, २०२१ रोजी सकाळी ०८.१५ वाजता मा.महापौर, पुणे यांचे शुभहस्ते ध्वजारोहण व राष्ट्रध्वजास मानवंदना समारंभ महापालिका भवन प्रांगणामध्ये आयोजित करण्यात आला आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापन दिन राष्ट्रीय कार्यक्रमासाठी सर्व खातेप्रमुख यांनी उपस्थित रहावे तसेच आपल्या नियंत्रणाखालील सर्व विभाग व उप विभागातील सेवकांना ध्वजारोहण कार्यक्रमाचे अगोदर किमान १० मिनिटे महापालिका भवनाचे प्रांगणात उपस्थित राहण्याच्या सूचना द्याव्यात.

राष्ट्रध्वजारोहण समारंभासाठी उपस्थित अधिकारी/कर्मचारी यांनी खालील नियमांचे पालन करावयाचे आहे.

१. कोरोना विषाणूची पार्श्वभूमी विचारात घेता सहभागी अधिकारी/कर्मचारी यांनी सामाजिक अंतर पाळणे आवश्यक आहे.
२. समारंभास उपस्थित सर्व अधिकारी/सेवकांनी राष्ट्रीय पोषाख परिधान करावा.
३. समारंभास उपस्थित अधिकारी/सेवकांनी मास्क परिधान करणे बंधनकारक आहे. सुरक्षित वावराच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करावे.

तरी, उपरोक्त नियमांचे पालन करुन महापालिका अधिकारी/सेवकांनी राष्ट्रध्वजारोहण कार्यक्रमास उपस्थित रहातील, याची दक्षता संबंधित खातेप्रमुख यांनी घ्यावयाची आहे.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका.

प्रत :
१) मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि./ज./ ई.)
पुणे महानगरपालिका.
यांजकडेस माहितीसाठी..
२) सर्व मा.खातेप्रमुख / महापालिका सहाय्यक आयुक्त / विभागप्रमुख,
पुणे महानगरपालिका.
यांजकडेस माहिती व जरुर त्या कार्यवाहीसाठी रवाना...

(शिवाजी दौंडकर),
मुख्य कामगार अधिकारी,
पुणे महानगरपालिका.